# मुंबई विद्यापीठ

प्रसिद्धी पत्रक

दिनांक- ११ मार्च, २०१६

तृतीय वर्षाच्या कला शाखेतील (TYBA) पदवी परीक्षांचे नवीन वेळापत्रक

अडीच महिने चालणारी परीक्षा अवघ्या नऊ दिवसांत

मुंबई – मुंबई विद्यापीठामार्फत घेण्यात येणाऱ्या कला विद्याशाखेतील (TYBA) तृतीय वर्षाच्या वार्षिक आणि सत्र परीक्षा ( Yearly Pattern & Semester Pattern) सलग दोन महिने एवढ्या दीर्घ कालावधी चालू असतात, तरी हा दीर्घ कालावधी कमी करुन सदर परीक्षा ९ दिवसात पुर्ण करण्याच्या उद्देशाने व या शिक्षणक्रमाच्या वेळापत्रकामध्ये सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने वेळापत्रकाची नव्याने रचना केली आहे.

मुंबई विद्यापीठकडुन कला शाखेअंतर्गत ४५ विषयांच्या परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षांना सुमारे वीस हजार विद्यार्थी प्रविष्ठ होतात. विद्यार्थांना दिलेल्या विषय निवडीच्या स्वातंत्र्याप्रमाणे विद्यार्थी त्यांना हवे ते विषय ( Single Major किंवा Double Major) निवडुन कला शाखेच्या पदवी परीक्षांस प्रविष्ठ होतात. परिणामी ही परीक्षा सुमारे अडीच महिने सुरु राहते व नंतर वेळेवर निकाल घोषित करणे अवघड बनतेय ही अडचण ध्यानी घेऊन मुंबई विद्यापीठाने नवीन पद्धतीचे वेळापत्रक कला शाखेतील पदवी परीक्षांसाठी आखले असुन अवघ्या नऊ दिवसात ही परीक्षा घेणे सहज शक्य होईल व परीक्षांचे निकाल ठरलेल्या मुदतीत घोषित करता येतील.

सुचना १ - या परीक्षांसाठी Single Major विषय घेऊन प्रविष्ठ होणा-या विद्यार्थांना पहिल्या सलग सहा दिवसांच्या परीक्षेला बसणे अनिवार्य राहील. म्हणजेच या विद्यार्थांची परीक्षा पहिल्या ६ दिवसांत पुर्ण होईल.

उदा. एखादा विद्यार्थी या परीक्षेसाठी मराठी हा विषय घेऊन प्रविष्ठ होणार असेल तर त्याची या विषयाच्या पेपर क्र. ४ ते ९ ची परीक्षा पहिल्या ६ दिवसात घेतली जाईल.

सुचना २- या परीक्षांसाठी Double Major विषय घेऊन प्रविष्ठ होणा-या विद्यार्थांना त्यांनी घेतलेल्या विषयांच्या इंग्रजीतील नावाच्या Alphabetically Order प्रमाणे प्रथम येणा-या पहिल्या विषयाचे ३ पेपरच्या परीक्षेसाठी पहिल्या तीन दिवसात प्रविष्ठ होणे अनिवार्य राहिल व दुस-या विषयाचे ३ पेपरच्या परीक्षेसाठी शेवटच्या तीन दिवशी प्रविष्ठ होणे अनिवार्य राहिल.

उदा. एखादा विद्यार्थी या परीक्षेसाठी मराठी व इतिहास हे Double Major विषय घेउन प्रविष्ठ होणार असेल तर Alphabetically Order प्रमाणे प्रथम येणा-या विषयाची म्हणजेच इतिहास या विषयाचे पेपर क्र. ४, ५ व ६ ची परीक्षा पहिल्या ३ दिवसात म्हणजेच पहिल्या, दुस-या व तिस-या दिवशी होईल व मराठी या विषयाचे पेपर ४, ५ व ६ ची परीक्षा शेवटच्या ३ दिवसात म्हणजेच ७, ८ व ९ व्या दिवशी होईल. विद्यार्थांनी त्यांच्या प्रवेशपत्रावर ( Hall Ticket) वर नमुद केलेल्या तारखांप्रमाणेच परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क / प्रकाशन / सांख्यिकी )